# रानकवी ना. धो. महानोर

A PROJECT REPORT

Submitted By

गोडके शिवराज बालू

*In partial fulfillment for the award of the degree*

Of

*BATCHLAR OF ARTS*

IN

मराठी

**JAWAHAR ARTS , SCIENCE AND COMMERCE COLLEGE,**

**ANADUR, DIST: OSMANABAD, 413603**

Dr.Babasaheb Ambedkar Marathawada University,

Aurangabad (MS) India

MARCH 2022

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University

B. A. III ed years Project Examination Year and Month M/A - 2022

Centre Jawahar ASC College, Anadur Subject Marathi

REPORT OF ATTENDANCE OF CANDIDATES AT THE PRACTICAL EXAMINATION
**(to be submitted alongwith mark list)**

Batch No. one

NAME OF EXAMINATION

Dr. R. S. Nalge, Jawahar ASC college, Anadur

Dr. Laxuman Thitte (Ex. Exam) ASC College, Naldurg.

| Date of the Practical Examination and Time | Total No. of Candidates called for Examination | Total No. of Candidates Present at the Examination on the Dates allowed to them | Seat No. of Candidates Examined out of turn | Seat No. of Candidates who were absent |
|---|---|---|---|---|
| 15/4/2022 10 to 01 | 04 | 01 NBF609516 | 03 | NBF609512, NBF609514, NBF609526 |

Examiner's Signature

(Dr. R. S. Nalge) (Dr. Laxuman Thitte)

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

दुरितांचे तिमिर जावो !

Shikshan Prasarak Mandal Anadur's

# Jawahar Arts, Science & Commerce College

Anadur, Tq. tuljapur, Dist. Omanabad.413603

## CERTIFICATE

This to certify that Mr./ Miss. Godave Shivraj Balu

of the B.A.III Class ~~Roll No.~~ Seat No NBS.609516 has completed the

term works in the subject Marathi (project) (रानकवी ना. धों. महानोर) as prescribed by Dr. Babashaheb Ambedkar Marathwada University Aurangabad, Satisfactorily in the college premiese for acadamic

Year 2021-22

Professor Incharge | Examiner | Head of the Department

JAI MALHAR OFFSET, ANDUR-9922765135

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

# प्रमाणपत्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नीत जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर येथील घोडके शिवराज बाळूने बी.ए. तृतीय (मराठी) मुख्य विषयासाठी सादर केलेल्या प्रकल्पाचे मूल्यमापन खालीलप्रमाणे करण्यात आले.

| अ.क्र. | विवरण | गुण | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प मूल्यमापन | ८० | 60 |
| २ | मौखिक | २० | 15 |
| | एकूण | १०० | 75 |

सबब प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

परीक्षा आसन क्रमांक :- NBF 609516

मार्च / एप्रिल 2022

15/4/2022
अंतर्गत परीक्षक

बहिस्थ परीक्षक

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

# * रानकवी ना. धो. महानोर *

'रानारानात गेली बाई शीळ' या कवितेची ध्वनिमुद्रिका 1932 साली प्रकाशित झाली. तेव्हा तिने खळबळ उडविली. तरुण मंडळींच्या तोंडी ती ऐकताच बसली आणि घोळू लागली पण दबलेल्या सुरात, कारण वयस्कांना आणि अकालवयस्कांना तो नवा प्रकार नामंजूर होता. संगीत म्हणून आणि काव्य म्हणूनही शास्त्रीय संगीतातील दबदबा होता. रंगभूमीच्या त्या सरत्या वैभवकाळी हिंदुस्तानी संगीतातील अनवट रागात अथवा रागमिश्रणात आणि अवघड चालीत मराठी शब्द, जरूर तर कानामात्रा तोडून, बांधण्याचा खटाटोप चढाओढीने होता. या पदांना सहसा नाटकातही अर्थ, नसे मग स्वतंत्रपणे कोठचा? फार तर अस्ताईचा प्रसंगाशी धरावन्य जमे. अंतऱ्याला स्वःचाच अन्वय नसे. तानांच्या उडी टांगण्यासाठी सोयिस्कर तोबिच्या मात्रांच्या खुंट्या त्यांत हरिने बसवीत. हे तेव्हाचे लोकप्रिय संगीत अशा रीतीने पदांचे तराणे आणि गायकीचे आखाडे झाले असता सीधा ठेका व सुरेलपणा सांभाळून अर्थाचा खुलावट करण्यावर भर देणारी ही नवी गीतशैली वेगळेपनाने चमकून दिसली. नवाईचा बुजरपणा ओसरताच तरुण रसिक तिकडे

चमकून दिसली. नवाईचा बुजरेपणा ओसरताच तरुण रसिक तिकडे अधिकाधिक ओढला गेला. खानदानीचा ताठा उतरला नाही पण तिचा आवाज फिका पडला. त्याच सुमारास त्याच गायकाची म्हणजे श्री गोविंदराव जोशी मोची, भास्करराव तांबेंच्या डोळे हे 'जुलमि गडे' या कवितेत ध्वनिमुद्रिकाही बाहेर पडली. श्री केशवराव भोळे यांनी त्यापूर्वीच ती कविता ध्वनिमुद्रित केली होती. पण तिला उठाव आला नाही.

सौ ज्योत्स्ना भोळे यांनीही याच सुमारास काही निवडक कविता ढंगदारपणे मैफलीत गाऊन या नव्या रचनेवर रेखीव कलेचे जणू शिक्कामोर्तब केले. पण या प्रतिष्ठेला गाऊन या नव्या रचनेवर रेखीव कलेचे जणू शिक्कामोर्तब केले. पण या प्रतिष्ठेला पोचते न पोचते तोच हे नव वळण उलट दिशेने घसरू लागले, आणि लवकर संगीत गेले, काव्य गेले, उरले भावगीत गायन अशी दुर्धर अवस्था आली. लोकप्रिय संगीताचे केंद्र रंगभूमीकडून चित्रपटाकडे गेले आणि या नव्या कंत्राटदाराच्या बाजारी नीतीने त्या घसरगुंडीलाही कसबाची छटा दिली. ग्रॅमोफोनच्या तबकड्यांनी तीच छटा लाचारीने उचलली. कारण परिस्थितीमुळे त्यांना चित्रपटसंगीताच्या आश्रितताची कळा आली होती. ही लाचारी अनेक

गायकांच्या आणि गीतकारांचा पिंडाला मानवली. बिकट चालीच्या जुन्या जोखडा ऐवजी सैल चालीची नवी झूल किती हलकीफुलकी! म्हणून पूर्वीचे पद करणारे आता भागवती बनवू लागले आणि भावगीतकारांची नवी वीणा अशी निपजली की ज्यांनी त्या पदजुळ्यांना चांगले म्हणावयास लावले. तेच ते गोड शब्द घोळविले त्यांना बालिश भावनांशी डूब दिली आणि मात्रा मोडून नचवू फुस पुरवली. या सगळ्या बदफैलीत सुदैवाने काही कलावंतानी इमान राखले. अशा गीतरांकापैकी ना. घ. देशपांडे हे. डाक. प्रथम कवी आणि नंतर गीतकार कारण त्यांनी गायकांच्या गळ्यावर आपल्या कविता बेतल्या नाहीत. तर त्यातील गीतगुणानी गायक तिकडे ओढला गेला.

पण 'शाळे' च्या संगीता प्रमाणे त्यातील काव्यालाही त्यावेळी कित्येक नाके मुरडली आणि आढ्या चढल्या. वस्तुत ते दिवस काव्यगायनाच्या सद्दीचे गणेशोत्सात आणि तत्सम कार्यक्रमांत पूर्वी मेळ्यांना स्थान होते. ते करमुकीच्या या प्रकाराने आता बळकावले होते. पण त्या उभय करमणुकीत बोधपरता होती मेळ्यात अधिक उघड, काव्यगायनात थोडी आडून काव्य असे सोज्वळ की 'स्त्री-पुरुषांनी एकत्र बसून ऐकण्याजोगे' आणि लहानथोरांस त्यातील तात्पर्य समजून सांगण्याजोगे.

'शीळ'चे काव्य त्या दृष्टीने गैरसोयीचे थोडे उनाडचे. त्यातील धुंदी आणि खुलेपणा, मनात आवडल्या तरी जनात अवघडल्यासारखा वाटू लागणारा. तांबेंचे डोळे 'जुल्मी' असली तरी ते बाळबोध संसाराच्या जाड भिंगा आडून आणि त्याची 'जादुगिरी' माजघरापुरती मर्यादित होती. तेव्हाचे लोकप्रिय गायक-कवी गिरीश, यशवंत अथवा माधव यांच्या काव्यातील प्रणयही नेमस्त असे. 'प्रणयपंढरीचे वारकरी' हे त्यांचे अर्ध-विनोदी बिरुद फार गाजले त्या माधव जुलियनांच्या काव्यातील प्रणयही मार्यादशील होता. त्यातच शुद्ध कवीच्या तोंडून तो कानाला अधिकच मवाळ लागायचा.

तांबेंचा पहिला संग्रह 1920 साली प्रसिद्ध झाला. असला तरी त्या विशिष्ट गीतशैलीने त्यांना लोकप्रियता आणि चेल मिळवून दिले ती त्यानंतरच्या काळात बहरली. त्या शैलीने काव्यारंभी रागाचे नाव सांगून संगीताशी आपले नाते घट्ट केले आणि अर्थाला त्याच्या नादी लावले. रविकिरण मंडळाचे काव्यगायन तुलनेने बाळबोध वाटू लागून श्रोता आता या उघड गायकी बाजाच्या आहारी गेला. त्याला साजेसे रंग काव्यविषयातही होते. रविकिरणांची फिकी वास्तवता नकोशी झाली. तांबेंत मध्यभारतीय सरंजामशाहीचा वेगळा थाट होता त्यातील विलासाची सूचना रुचकर वाटली.

प्रेमही अधिक धीट झाले. पुरुष-प्रकृतीच्या वेदांती रूपकात राधाकृष्णाच्या पौराणिक सबबीतल्यांहून उन्मादाला कितीतरी मोठी सवड मिळाली. या सगळ्या भुलावणीच्या बळावर तांबेशाहीने रविकिरण मेळ्यावर कुरघोडी केला. ना. घ. देशपांड्यांच्या काव्यात नादसौंदर्य असेल आणि उन्मादही असला, तरी ती तांब्यांच्या पठडीतील नाही. तो नाद कोमल व्यंजने बांधून जमा केला नाही. त्यात पदलालित्यासाठी संस्कृत समासांचा आसरा घेतलेला नाही. तो जणू अर्थाचेच एक अंग आहे. या काव्याला 'चाळी' चा बडेजाव नाही. त्यातील उन्माद रूपाचे अंतर न ठेवता अनुभवाच्या आधीन होता म्हणून त्याला वैयक्तिकतेची तीव्रता येते. तांब्यांच्या आणि त्यांच्या चेल्यांच्या, बहुतेक कवितांत ती आढळत नाही.

लावणीतील उन्माद अनेकांना परिचित होता, पण तो आडमिळीचा. ज्या सुशिक्षित व अर्धशिक्षित वर्गाच्या रागलोभाविषयी आपण बोलत आहोत त्याला घरोदारी सोवळी शिकवण मिळाली होती. पातकांची जी भली मोठी यादी त्याला तोंडपाठ होती त्यात लावणी ऐकणे हे एक. तीही बाईच्या तोंडून ऐकायची या संकेतामुळेच ते पातक दुप्पट कडक झालेले. त्यामुळे अर्थातच त्याची लज्जतही वाढली. ते चोरून करायचे आणि त्याविषयी डोळे मिचकवून

बोलायचे. जरा पापभीरु पुरुष असला तरी तो लावण्या चोरून मारून फक्त वाचायचा. पण सगळे करून झाल्यावर वस्त्र झटकून मोकळा, पुन्हा परिटघडीच्या संभावित आणि घडलेल्या पापाचे क्षालन म्हणून शिष्ट साहित्यातील पवित्र्य सांभाळण्या बाबत तो फार जागरूक राही. पाप पुण्याच्या या पांढरपेशा हिशेबात हाही एक भाग होता की लावणी ही जुन्या काळची, तिला इतिहासाचा आणि परंपरेचा थोडासा रंग चढलेला. या पुराणपणाची सवलत तिला द्यायला हवी आणि त्यामुळेच कुळकुळलेल्या कल्पनेच्या प्रभावाने ती होती त्यापेक्षाही अधिक रंगेल वाटू लागली. आधुनिक काव्यात मात्र ती उत्तानता नव्हेच, पण थोडा मोकळेपणाही नको होता. आवरताच नाही तर तो प्रेमावेग गूढ रूपकात ठेवा, झिरझिरीत आध्यात्मक लपेटा, राधाकृष्णाचा आडोसा घ्या, निदान भारदस्त संस्कृत समासात थिजवा. तो कदाचित आपद्धर्म मानला जात असेल पण प्रेमाच्या मोकळ्या उच्चाराला काव्याला बंदी होती.

देशपांडयांनी 'शीळ' सप्टेंबर १९२९ मध्ये लिहिली. त्या वेळी ते नागपूरच्या मॉरिस कॉलेजात बी.ए. च्या वर्गात होते. त्यानंतरच्या या दोन वर्षात त्यांनी शेकडो कविता लिहिल्या, पण 'लिहिणे' आणि 'प्रसिद्ध करणे' हे कवि

कोशात समानार्थी शब्द होऊन बसलेल्या त्या काळातही त्यापैकी बहुतेक कविता बाडातच राहिल्या. या संग्रहापैकी एक-तृतीयांश कविता अजून अप्रकाशितच होत्या. त्यांतीलही दहा कविता अप्रसिद्ध असाव्यात असा कवीचा अंदाज आहे. अनेक कवितांचे लेखन-वर्ष कवीने 'अंदाजे' सांगितले आहे. या संग्रहातील अप्रकाशित कवितांपैकीही कित्येक पंचवीस वर्षांपूर्वीच्या आहेत! प्रसिद्धीसाठी आसुसलेल्या, अकाली विलंब झाला तर चटकन डोळ्यात पाणी येणाऱ्या उपेक्षेच्या शंकेने कुढणाऱ्या, आणि संग्रहासाठी प्रकाशक व परिक्षणासाठी टीकाकार यांची केविलवाणी वाट पाहणाऱ्या हळव्या कवींच्या जमान्यात देशपांड्यांनी बेफिकिरी विलक्षणच होती. तसल्या कवींचे खत मिळाल्यामुळे केशवकुमारांच्या झेंडूच्या फुलांना केवढा बहर आला! उलट संपादकांच्या विनंतिपत्रांना उत्तर लिहिण्यास टाळाटाळ करणारा हा कवी. फार मोठ्या मासिकांना त्यांच्या कविता प्रसिद्ध करण्याचे भाग्य लाभले. या कवितांवर लुब्ध झालेले रसिक संग्रहाची आतुरतेने वाट पाहत होते काही प्रकाशकसुद्धा उत्सुक होते. पण तो निघायला इतकी वर्षे लागली, कारण प्रकृतीचीच आणि काहीशी परिस्थितीतून उपजली असावी.

ना. घ. देशपांड्यांच्या कवितेवर

रसिक भाळले खरे, पण ते संख्येने थोडे होते.
बहुसंख्य वाचकांना त्यांची ओळख असलीच
तरी अगदी पुसट होती. 'वऱ्हाडातील आणखी
एक देशपांडे' अशी मनातल्या मनात
संभावना झाली असणार. एक तर कविता थोड्या
दुसरे म्हणजे "दावू गाऊनि आमुच्याच कविता
आम्हीच रस्त्यामध्ये" या पठडीतला हा कवी नाही.
१९५१ साली मुंबई रेडिओने कविसंमेलन भरविले.
तेव्हा ना. घ. देशपांड्यांनी कविता सरळ वाचून
दाखवली ना सूर ना ताल आणि नाराजी ओढवून
घेतली. ज्याला गळा नाही तो कवी कसला,
ही सामान्य वाचक-श्रोत्यांचीच नव्हे तर
बहुतेक साहित्यिकांची भावना! गद्यपद्य-
-विषयाच्या बालिश कल्पना तेव्हा भरात
होत्या. आता अर्थाला उठाव देणारे काव्यवाचन
ऐकून घेण्याइतकी समज हळूहळू येत आहे. तेव्हा
ती नव्हती. ध्वनिमुद्रित काव्याबाबतही -
काव्याविषयीचा पहिला उत्साह ओसरून श्रोत्यांचे
समस्त ध्यान संगीताकडेच लागले होते. तेही
मुख्यत: चालीकडे गीताचे तोंड मोहक हवे.
त्यावर सगळी मदार म्हणून त्याची सगळी
मशागत उरलेला भाग शेपटासारखा. सगळी
तो सोय आणि निकड पाहून कमी अधिक
लांब व्हायचा. आवडीचे म्हणून गाणे
गुणगुणताना बहुतेकांच्या स्मरणाशी धाव त्या
'ध्रुपदा' पुरती असायची. कडवी द किंवा न

च्या बाराखडीने भरून काढायची. तांबे आणि रविकिरण या उभय घराण्यांच्या गायकी कवितेत ध्रुपदाची मिजास होती. नादमधुर हे गबाळे विशेषण खरोखर त्या तोंडापुरतेच असे. बारीक नजरेने पाहिले तर तशा कवितांत सफाईदार, नाजूक अक्षरांनी खचलेले ध्रुपद आणि पुढे खडबडीत कडवी अशी विजोड कामगिरी वारंवार दिसते. जातिरचनेत ही वरच्या सफाईची मोठी सोय म्हणून ती इतकी लोकप्रिय झाली असावी. कवितेवर तिची चालच नव्हे तर 'राग' ही सांगण्यातील कटाक्ष अर्थपूर्ण आहे. काव्यात संगीत असते या तत्त्वाचा ढोबळ अर्थ घेऊन कवितेत स्वरलेखन जमले की तिचे सार्थक झाले अशी श्रद्धा. देशपांडयांच्या काव्यातील संगीत केवळ चालू, नाजूक शब्द, यमके असल्या उसन्या ढंगात नव्हते ते सलग, सूक्ष्म आणि तांबयांच्या काही उत्कृष्ट गीतां प्रमाणे अर्थाशी काव्यासारखी नसते. म्हणून काव्य-संगीताचे थोर वरदान असणारा हा कवी काव्यगायनाच्या काळातही अनोळखीच राहिला. तोही केवळ सामान्य वाचकाच्या हिशेबी नव्हे. त्याला ज्यांनी दिशा दाखवायची त्या टीकाकारांनाही त्याची पुरी दखल नव्हती. प्राध्यापक रा.श्री. जोगांसारख्या व्यासंगी आणि मर्मज्ञ टीकाकारानेही १९४६ सालच्या 'अर्वाचीन मराठी काव्य' या ग्रंथात ना. घ. देशपांडे यांना 'नवोदित' कवींच्या रांगेत उभे करून

"जानपद वातावरणाच्या आणि प्रेमाच्या कविता अनेकांच्या सुखांत आज असलेल्या दिसतील" या पाठयोपटणीवर त्यांची बोळवण केली आहे. एकत्रित काव्यसंग्रहाच्या अभावी त्यांच्या काव्याचा योग्य तो परामर्श होणे अशक्य झाले आहे या त्यापुढील कबुलीत थोडीशी सबब आहे पण ती अपुरी वाटते. काही व-हारी साहित्यिकांना या उपेक्षेत सूक्ष्म अढी भासली. पण आता प्रा. भवानीशंकर श्री. पंडित या तत्प्रांतीयाच्या आधुनिक मराठी कविता या ताज्या 1953 इतिहासात ना. घ. देशपांडयांच्या खाती चार ओळी अधिक खर्ची घातल्या असल्या तरी त्यांत पद्याचे प्रसाधन आणि नादमाधुरी यांपुरतेच गुंजबी रसग्रहण आहे. आणि प्रेमगीतांत भावनेच्या आविष्कृतींपेक्षां पद्याच्या प्रसाधनाला अधिक महत्व दिलेले असते, असा वर शेरा आहे. आधुनिक साहित्याचा आणखी एक ताजा इतिहास म्हणजे डॉ. वि. पा. दांडेकरांचा त्यात देशपांडयांचा केवळ नामोल्लेख आहे. दहा-पंधरा कवींबरोबर त्यांचे नाव एका वाक्यात कोंबलेले आहे. अशी त्यांची टीकाकारांकडून संभावना झाली आहे.

भावगीत हे इतर अनेक साहित्य-प्रकारांप्रमाणे आपण इंग्रजीतून उचलले. लिरिक या इंग्रजी नावाने ग्रीक मूळ शोधून त्यातील संगीत-छटा आणण्याची भाषा तरी खटपट

वैयक्तिक या शब्दाने केली. पण खुद्द इंग्रजीतच ती छटा केव्हाच हरवून त्यामागील भावपरतेचे लक्षण स्थिर झाल्याचे ध्यानात येताच भावगीत हे नाव अधिक योग्य वाटून प्रचारात आले. पण नावनिश्चीबाबत व्युत्पत्तीचा पेडिती पुळका आपल्याला नेहमीच फार तेव्हा त्याच्याशी तडजोड म्हणून गीत पद राहिलेच। वस्तुत इंग्रजी साहित्य विचारातही या काव्यप्रकाराची निश्चित सरणी नाही नव्हती. काळाप्रमाणे तिचे रंग बदलत गेले. मराठी भावगीतकारांच्या पहिल्या पिढीला स्फूर्ती मिळाली. ती एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वाधातील 'रोमँटिक इंग्रजी कवींकडून. त्या कवींची उत्कट आत्मपरता सौंदर्यसक्ती, निसर्गपूजा, बंडखोरी इ. विशेष आपल्या कवीत निरनिराळ्या मिश्रणांनी आणि कमीअधिक प्रमाणात उतरले. त्यापैकी ~~आत्मपरता~~, आत्मपरतेचे माहात्म्य सर्वात अधिक पण रोमँटिक या शब्दाप्रमाणेच आत्मपरता अथवा भाव-लेखन या विशेषासंबंधी गैरसमज झाले. वर्ड्स्वर्थच्या 'स्पॉन्टेनिअस ओव्हरफ्लो ऑफ पॉवरफुल फीलिंग्ज' या अर्धव्याख्येच्या चिथावणीने धर भावना कर कविता असा घसमुसळा उद्योग शिष्टमान्य होऊ लागला. ती भावना विचारात जिरण्याइतकी उसंत तिला न देता वरच्या फेसाची हलकी फुलकी मांडणी व्हायची. पण गंभीरता आणि बोधकता

असल्याशिवाय काव्य उच्च होणार नाही या संकेतामुळेच साचलेल्या आणि अचेतन विचाराच त्याला आधार पुरवायचा. भावनेला विचाराचे वजन नाही, की विचाराला भावनेची ऊब नाही. दोन्ही एकजीव होईनात. आधुनिक कवितेच्या पहिल्या प्रहरीच केशवसुती ओघाला विनायकी मुरड पडली ती पुढे बहुतेक कवींच्या प्रकृतीला मानवली. चेचल भावना आणि मागे फरफटणारे शिथिल विचाराचे ओढणे या असमंजसपणात किती तरी आधुनिक कविता अडखळून पडली. ज्या कवींत ही विकेंद्रितता टळली त्यांच्या काव्यात भावना आणि विचार यांचे रसायन एकजीव जमून आले आणि सुट्या भावनेतील संकुचित आत्मनिष्ठा व्यापक झाली. वैयक्तिक सुख दुःखाचे हर्ष विषाद व्यक्तीपार पसरून त्यांना परार्थ आला. कवीचे स्वप्न हे खाजगी खेळणे राहिले नाही. त्यात बहुजनांनी आशांची पूर्ती पाहिली आणि निराशांपासून निवारा घेतला.

ना. घ. देशपांड्यांच्या कवितेतील गीतगुण, लालित्य, ग्रामीण चित्रसौंदर्य असल्या विशेषांवर भर देण्यात ती केवळ गौण अंगे आहेत याची जाणीव सुटते. 'प्रेमाचे कवी' ही बाबळट चिट्ठी त्यांच्यावर डकविण्यात येते. तीही कित्येकदा अशा अभिप्रायाने की

नवतारुण्यातील भाबड्या स्त्रीपूजेची हिरवट गाणी लिहिणारा हा कच्चा कवी आहे. आपल्याच अवस्थेत सापडलेल्या वाचकांना चार क्षण झुलविण्या पलीकडे त्याच्या काव्यात सामर्थ्य नाही. त्याला विचाराचे बावडे. आणखी असाही सूर निघतो की, जगाकडे पाठ फिरवून प्रेमाच्या नाजूक भावुकतेत रंगलेला हा कवी पलायनवादी आहे त्याचे काव्यही पोकळ आणि तकलुपी. त्याला जीवननिष्ठा नाही.

खरे म्हणजे ना. घ. देशपांड्यांच्या काव्यात आकृती, नाद आणि चित्रमयता यांची दसदशांत लावण्ये आहेत. त्यांच्या बहुतेक कविता प्रेमाविषयी आहेत इतकेच नव्हे तर ते प्रेम माणसाचा वारा टाळून दूर रानी आसरा पाहते. ती चकाकली सगळी दूर राहिली दुनिया या तमामध्ये वसवू प्रेमपाठ श्रृंगारी. हे सगळे उघडच आहे. पण याहीपेक्षा कितीतरी अधिक त्या काव्यात आहे. त्यातील प्रेम हीच निष्ठा आहे. ते काव्यश्रृंगारापुरते नुसते प्रेमाचे प्रेम नाही. अति उत्कटतेमुळे या निष्ठेल्या स्वप्नाचे रूप चढले आहे. स्वप्नाप्रमानेच ते प्रेम क्षणपूर्तीच्या भासाने आणि विफलतेच्या चटक्यांनी सुखविते आणि दुखविते. तेही असे की सुखदु:खामधील रेषा हरवावी. पण या सनातन निष्ठेला नैसर्गिक प्रेमाला दुराव्याने

माणसातून उठविणाऱ्या आणि ओसाडीत वसविणाऱ्या समाजाची काळवंडलेली पार्श्वभूमी येथे आहे. पापीच निघाले सगळे पुत्र मनूचे. या पापाच्या सावलीला भिऊन संकोचणारे, तर कधी जणू ती विसरण्यासाठी उन्मादात रंगणारे प्रेम 'व्यावहारी' आणि 'स्नेहशून्य' जगाचा धाक आणि तिटकारा त्यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनी हे काव्य विणलेले आहे. त्यातील प्रेमाचा धागा आपल्या विविधरंगी झळाळीने नजरेत भरतो. दुसरा जन-निषेधाचा धागा फिका वाटला तरी त्याला पीळ अधिक आहे. या वस्त्राच्या सर्व रंगछटा मूळ धाग्यांच्याच आहेत नंतर बाजारी रंगोटी त्यात केलेली नाही. हे घटक नितळपणे एकरूप झाले आहेत. कवितेचे परम यश म्हणजे ही एकरूपता अथवा एकात्मता. ना. घ. देशपांड्यांना लाभलेले हे यश आपल्या काव्यप्रांतात वाटते तितके सुकाळाचे नाही.

वस्तुतः समाजाचा धिक्कार ही आधुनिक साहित्याइतकीच जुनी गोष्ट आहे. किंबहुना ती केव्हाच साहित्यिक रूढी होऊन बसली आहे. प्रेम-प्रकरणात हटकून बिब्बा घालणारा, तसेच स्त्रिया मजूर-शेतकरी-अस्पृश्यादी दरिद्री, आणि सरकट ध्येयवादी यांना गांजणारा खलपुरुष म्हणून शेकडो नाटक कादंबऱ्यांतून तापलेल्या विशेषणांनी आणि उद्गारचिन्हांनी सुद्धा त्याला टोचलेले आहे.

काव्यानेही त्याला सोडले नाही. पण समाजाचे
कातडे गेंड्याचे त्याच्यावर मामुली ओरखंड्या-
-पलीकडे काही परिणाम झाल्याचे नमूद नाही.
साहित्याची शस्त्रेच बोथट अथवा लुटुपुटीची
असे नव्हे तर ती चालविणाऱ्यांत त्यालित्या
ची काळण हातात भरलेले शेंदाडशिपाईच
अधिक त्यामुळे वरवर चालला वार आणि तोही
अऱ्यांनी करून जिंकल्याची आरोळी मारणाऱ्यांच्या
वीरश्रीने साहित्य उगाच गजबजून गेले. हरडाक
कथाकवितेने दिलेल्या धुशीमुळे समाज पुढे सरकत
आहे. अशी अनेकांची भळळ समजूत आहे.
केशवसुत, आगरकर अथवा हरी नारायण आपटे
या आघाडीच्या धारकऱ्यांनी रण गाजविले. त्यांचे
नाव घेऊन त्यांच्या हातवाऱ्यांची सुबक नक्कल
करणाऱ्यांची पुढे झुबड उडाली. केशवसुतांचा
शुद्ध त्वेष किती थोड्या लोकांत उतरला! त्यांच्या
मानीव वारसदारांपैकी बहुतेकांचा सुधारणावाद
म्हणजे बारीकसारीक चिरचीर होती त्यांची वृत्त
नटपकी होती. त्यांना समाज 'पुढे' जायचा म्हणजे
कोठे याची स्पष्ट कल्पना नव्हती. म्हटला तर पुढे
म्हटला तर मागे हे सावधपणाचे धोरण सोयीचे
वाटत होते. एकंदरीने मागेच दृष्टी पुनः पुन्हा
भक्तीने वळत होती. ना. घ. देशपांड्यांच्या
कवितेची दृष्टी एकाग्र आहे प्रेम हा तिचा
अनन्य विषय त्यात व्यक्तता आणणाऱ्या समाजाची
त्यांना उबग आहे. इतर सुधारणाशी पर्यायाने

इतर समाजदोषांशी त्यांना कर्तव्य नाही. हा एकांगीपणा [struck out] असेल, पण तो काव्याला पोषक आहे. या काव्याचे बळ विखरून वाया जात नाही.

उदाहरण म्हणून संग्रहातील 'आज जाऊ दूर रानी' या कवितेची माधव ज्युलियन यांच्या तेथे चल राणी या सुप्रसिद्ध कवितेशी तुलना करण्यासारखी आहे. प्रेमपूर्तीसाठी दूर, कोठे तरी रानांत जाण्याची भूमिका उभय कवितांत आहे. तसेच व्यावहारी या जगाचा फायदा व जीव जाळी ही देशपांड्यांची ओळ व त्याच्या मागील आणि पुढील अशा आणखी दोन ओळी काहीशा माधव ज्युलियनी धाटाच्या आहेत. पण देशपांड्यांच्या कवितेतील अधीर वृत्तीची निःसंगता आणि अगतिकता तेथे चल राणीत अल्पांशानेही नाही. कारण माधव ज्युलियनांचा प्रेमिक नुसताच प्रेमिक नाही. तो समाजाच्या दोषांची लंबीचवडी यादी आपल्या राणीला सुनवतो. रानावनातील त्याच्या अज्ञात ठिकाणी जो स्वर्ग वाट पाहत आहे त्यात प्रेमाशिवाय स्वातंत्र्य, शांती, साधेपणा, सत्य, निःस्वार्थता, कष्टाळू राहणी इ. ध्येयांस पुरावाव असल्यामुळे शेवटी शुद्ध प्रेमासच तेथे कवितेतल्याप्रमाणेच — अवघडलेल्या होणार. ते हवेत माझे मला सखे परि भवती सदा गलबला अशी यशवंतांच्या डाका नायिकेसारखी ही बापडी राणी हिरमुसणार. आल्या अनिकेतास सुखे स्वागत रानी असा गृहिणी धर्म

धर्म पाळण्यास तिला बजावले आहे. पण शेवटची त्यातूच फारच बिकट आहे.

"अंकावर खेळून शिकू स्वविलसतीच्या आत्मप्रगतीच्या त्या गूढ कथा ज्या न कुराणीं, न पुराणीं, तेथे चल राणी"

येथेच कविता संपते. शेवटी मनावर संस्कार राहतो तो कोमट सुधारणावादाचा, किंवा ध्येयवादाचा प्रीतीच्या आवेगाचा नाही. प्रीतीला नव समाजरचनेच्या स्वप्नाचे कोंदण पुरविण्याचा हा प्रयत्न आहे म्हणजे तर कोंदणाच मुख्य ऐवज खाऊन टाकते. निबर उपदेशबाजीमुळे आणि उत्कटतेच्या अभावामुळे कवितेला कोणच स्वप्नकळा येत नाही. वास्तवतेचा आरोप करायचा म्हटले तर रानावनांतील अज्ञात ठिकाण चमत्कारिक वाटते. असो देशपांडयांची कविता त्यांबीने बरीच लहान अगदी जेवढ्यास तेवढी आहे. तिची धुंदी अभंग आहे. जगाची आठवण त्यात आहे ती विसरण्यापुरतीच आहे. क्षणभर विरोधासाठी या रानात 'सौंदर्यशाली 'सांज चांदण्याची शुभ्र जाळी विणली जाण्याची वाट पाहत आहे. प्रेमाच्या देवघेवीचा वेडा सौदा तिथे पडतो. काव्यही पटते कारण त्यावरील अवधान एका शब्दातही सुटत नाही. देशपांडयांची एकाची राणी ही कविताही अशीच रानच्या स्वच्छंद प्रणयाविषयी आहे. पण तीत पहिल्या अनावर भाराऐवजी तृप्तीचा गाढ आनंद आहे.

वरील तुलनेत माधव ज्युलियन आणि यकंदरीने रविकिरण मंडळ, यांच्या प्रेमकाव्यातील पुस्तकी प्रतिबिंबपणा आणि संकोच व ना. घ. देशपांड्यांची निर्भरता आणि धुंदी यातील अंतर मनात ठसेलच. पण समाजाबाबतच्या या कवींच्या वृत्तीतील भिन्नता विचारात येत नाही. कवी म्हणून देशपांड्यांचा जन्म झाला तो काळ रविकिरण मंडळाचा ऐन मोसम होता. त्याचा उडता वास तरी त्यांच्या काव्याला लागणे नैसर्गिक आहे. आणि तो लागलाहि आहे. पण देशपांड्यांचा मूळ गंधच निराळा त्यांच्या धमघपाटात रविकिरणांचा मंद वास कोनाकोपऱ्यात शोधून मिळायचा.

एकोणिसशे वीसनंतरच्या दहापंधरा वर्षात रविकिरण मंडळाला मोठी कीर्ती लाभली ती साहजिक होती. कारण त्या पिढीच्या इच्छा-आकांक्षा मंडळाने तिला समजतील आणि रुचतील अशा भाषेत बोलून दाखविल्या. टिळकांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात त्यांचे राजकारण हातपाय पोटाशी घेऊन सुस्त झाले आणि तोवर त्यांच्या कह्यात असलेले त्यांचे समाजकारण मात्र चेकाळून गुण दाखवू लागले. ते उघडपणे प्रतिगामी होते. उत्तपेशवाई त्याला पुन्हा निर्माण करायची होती. हीच त्यांची संस्कृति -संरक्षणाची योजना. उलट लोकहितवादीतून उगम पावलेला आणि आगरकरांनी पुढे भव्यता दिलेला पुरोगामी विचारांचा प्रवाह कालांतराने क्षीण झाला.

रविकिरण मंडळाचा सुधारणापद असाद फिकट होता. तरीही तो विशेषतः माधव जुलियन योच्यापुरता तरी तत्कालीन रूढिग्रस्तांना महात्व वाटला. यात त्या रूढीचा मागासलेपणा स्पष्ट होतो. स्त्री-पुरुष-संबंध हा अर्थातच अटीतटीचा विषय त्या संबंधांतील मोकळेपणाच्या अभावामुळे संसार कुबट झाले होते. पण सनातन्यांना त्यातच पावित्र्य दिसत होते. या कोंडमाऱ्यातून सरळ वाट म्हणजे बंडखोरी ती डनपणारे फार थोडे पळवाटा मात्र दोन होत्या. पावित्र्याचे सोंग कायम ठेवून खाजगी बदफैली ही एक आणि दुसरी म्हणजे कल्पनेला चेतवून तिने पुरविलेल्या मुक्त प्रणयाच्या कैफात गुंगायचे. ते नेहमीच जाणूनबुजून होई असे नाही कित्येक कवीचा तो प्रकृतिधर्मच होता. आणि त्यात इंग्रजी साहित्याचे विशेषतः रोमँटिक साहित्याचे वाचन कल्पनेला आणखी गुदगुल्या करी. तो कैफ अर्थातच कवीच्या कल्पनाशक्तीच्या प्रमाणात कमी अधिक असे गोविंदाग्रजात त्याचा जो फार होता. वाचकाच्याही डोक्यात तो सहज शिरे.

गोविंदाग्रजांच्या उद्दाम कल्पनशक्तीने मराठी काव्यात जे वारे आणले त्यावर उतारा म्हणून रविकिरण मंडळाने त्याच्या संसाराच्या गाड्याला जुंपले व त्याचे सौंदर्य वाढविले असले जाते. कल्पनेचे पंख कापून तिच्या स्वैर भराऱ्या त्यांनी थांबवल्या. पण संसारावर त्या पंखाचे कलप नीट जमेना

आणि दोन्ही खुरडू लागली. पण उड्डाणाचा भास उगाच होत राहिला. ईषा उंच होत्या. कळकळही प्रामाणिक होती. पण मेंडळ झाल्यामुळे विविध प्रवृत्तींना सामावून घेता घेता ते इतके पसरट होऊन बसले की त्याला आकार येईना. नवे जुने, शहरी - ग्रामीण, पंडिती - अपंडिती, कवि - अकवी यांची भेसळ झाली. त्यातच बहिरंगाची चिकित्सा आणि कौतुक फार वाढले इतके की अंतरंग जेवढे बाहेर येऊन बसेल तेवढे छान असे वाटू लागले. गणमात्रांचे नवीन साचे बसवून अथवा जुने मुद्दाम कुडकून त्यावर नावनिश्री चिकटविण्याच्या हव्यासात सुद्धा काव्याची आबाळ झाली. प्रयोग याला इतकाच अर्थ उरला ना.सी. फडक्यांचे गद्यतील सुबक साचे याच सुमाराला बाजारात आले आणि लोकप्रिय झाले. त्यांच्या प्रेमालाही उत्तान आणि त्यांना प्रेमाचे कादंबरीकार म्हणण्याचा प्रघात पडला. ते प्रेम फक्त सुबक होते. कोठे तरी जाऊ बसुनी च्या रविकिरण अज्ञात ध्येयवाद लवकरच वि.स. खांडेकरांत रंगून उठला. तोही सुबक होता. संसारतापाने जिवाची तल्खही झाल्यास या काव्याने आणि साहित्याने गारव्यासाठी पाणपोई पुरवली. तीत तापदायक समाजाला उपदेशाच्या चार गोष्टी कधी गोडीगुलाबीने तर कधी कडकडूनखडसून सांगण्याचीही सोय होती.

ना. घ. देशपांड्यांच्या कवितेला समाजाला काही सांगायचे नाही. ती आपल्याच

मर्यादित परिघात गुंगलेली आहे. त्या परिघात अन्य विषय येत नाहीत. या प्रणय- धुंद काव्यातील स्त्री ही केवळ स्त्री आहे ती परजातीची अथवा संपत्तीने परवर्गातील नाही पतिता नाही, अथवा बालविधवाही नाही. तिच्यावर कसलाही अन्याय झालेला नाही. तिच्या स्त्रीत्वाला असा कोणताच आगंतुक गुण चिकटविलेला नसल्यामुळे - तिच्याविषयीचे प्रेम शुध्द आहे म्हणजे ते फक्त प्रेम आहे. त्यात दया, सहानुभूती, उध्दार इत्यादी सामाजिक लचांडे नाहीत. जेथे समाजाचा विसर पडायला प्रेम शोधायचे तेथे पुन्हा त्याच्या - बऱ्यावाइटाची उजळणी कशाला? झाले जगाचे कडे माझ्यातुझ्याभोवती असे आपल्यापुरते जग आवरणारी ही प्रेम-समाधी आहे. ती उपऱ्या विचारांनी ढळत नाही.

पण या प्रेमाला जशी जगाची बाधा नाही तसा आध्यात्माचाही नेहमीचा उत्पाहा आव नाही. अलौकिक उत्कटतेचे हे प्रेम सर्वस्वी लौकिक आहे शारीर आहे. त्याला सांकेतिक आडपडदा नाही. कवीला प्रीतीतून मुक्ती नको प्रीती हीच त्याची मुक्ती. त्या पिढीतील अर्धवट सुधारकाला स्त्रियांना गोषातून बाहेर काढायचे होते पण स्त्री- प्रेमाला झिरझिरीत का होईना पण कसला तरी गोषा चढवायचा होता. देशपांड्यांनी तो कधीच पाळला नाही. उलट, बहुतेक उर्दू

प्रेम- कवीची सुंदरी गोपातलीच, पण त्यांचे शाब्दिक विलास उठवत असायचे ती स्त्री बिशिष्ट नाही. कोणतीही स्त्री फक्त ती लावण्याची पुतळी हवी. भाळलेल्या कल्पनेने तिच्या अंगप्रत्यंगाची वस्तगाळ वर्णने घोटायची सगळी सौंदर्य अवयववार कोरायची पण ती सांकेतिकच देशपांडयांच्या कवितेतील स्त्री ही केवळ स्त्री असली तरी या उडाणटप्पू उद्धू अर्थाने कोणतीही स्त्री नाही. तिला नावगाव नसेल तरी, व्यक्तित्व आहे फक्त शब्दांना धार काढून खेळविलेली नाही. आणखी एक महत्त्वाचा फरक असा की, देशपांडयांनी सजणीच्या सौंदर्याला कोठे फारसा गवगवा केला नाही. तिचे डोळे निळे फार फडी आहेत. तिची चांदणी कळा आणि नवी नव्हाळी कोठे उडून दिसते. पण हा अलग तपशील नाही. त्या भारलेल्या आठवणी आहेत. नजरेचे जुगार तुझ्यामाझ्यांत ही प्रिती स्त्रीवर आहे. सौंदर्यावर नाही. प्रीतीच सुंदर आहे. व तिच्या किमयेने त्या स्त्रीला लावण्यकळा आगळा चढली आहे.

पण विसरू म्हणून जग विसरता येत नाही निदान फार काळ नाही. त्याची कमी-अधिक दाट सावली देशपांडयांच्या काव्यावर पडलेली आहे. त्या जगात प्रीती करपून जाते. म्हणून येथे प्रीतीला मखर दिले आहे ते अंधार, दिवाळी चांदणे धुके असल्या कुंद निसर्गाचे तिची कळी फुलते ती सहसा

गर्द वनात. 'मधुजात तपाने विणले रे' अंधाराचा आसरा मोठा तेथे प्रीतीचा सवता सुभा विश्वासाने निर्माण होतो. काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे प्रेम सफल होते. आणि विफलतेने झुरते तेही ओसाडीत वसून या कवितेतील धुक्याचे उल्लेख मोजण्याजोगे आहेत. माघाची शिरशिरी अनेक कवितांतून धुक्याचे भरून राहिली. सुगीची नवकळा अथवा शरदाच्या ढगाची झील पहिल्या कवितापैकी श्रोत्यांना लाभली आहे. वसंताची मिरास या कवीने मानलेली नाही. या झाकळलेल्या निसर्ग-साजात नुसताच वेगळेपणा नाही. त्यात अर्थपूर्ण अनुरूपता आहे.

प्रेमाच्या होषात समाजाचे पाश तोडणाऱ्या किंवा तोडू पाहणाऱ्या या काव्यात खोलवर त्या पाशांचे वळ उठलेले आहेत. त्यांच्या अस्वस्थ आठवणींनी 'ऊनसावली'ची मिश्र म्हणून काहीशी नाट्यमय रंगत कवितांना येतेच. पण ते पाश अटळ आहेत, प्रेमाइतकेच अनिवार आहेत, ही जाणीव कधी सुटत नाही.

"मलाहि कळते सगळे पण हे मन होते भयभीत तरी
कशी त्यजू जनरीत तरी!"

या शंकेने व्याकुळ झालेली कोणी कुलवंता पुढे देवधर्म सोडूच कशी? असे विचारते. तिचे सामाजिक संस्कारही गाढ आहेत ही ओढाताण

कविताकवितातून मनात भरते. चिरत्वोंच्छित ही आपुलकी प्रीतीच्या तृप्तीत्याच चोरी लाज चुकी असले अधों -ओशाळे शब्द येथे आढळतात. ते त्यामुळेच मनांतले अन् जनोतले हे दुवे सहसा जुळत नाहीत. अंतरातील संकोच उघळून यावावा ही प्रीतीची मनीषा. त्यासाठी ती रानावनातील अंधार आणि चांदणे शोधते. पण क्षणभरच्या स्वैरतेत वर्तनातील संकोच ढळला तरी अंतराच्या गाभ्यातून तो कधी सरत नाही. चुकलेल्या अथवा मुक्या कोकराची प्रतिमा अनेकदा येते तिचा संदर्भ मला वाटते असाच काहीतरी असावा. येथे गळा चढविणारी कोकिळा अथवा मैना क्वचितच भेटते. सरण्हीचे संगीत हळुवार आणि मिठे आहे. कुजबुज आणि गुणगुण यांहून वर सूर लागत नाही.

“ कुजबुजतो तो आहे विकृत;
मुकाच बसतो तो आहे मृत;
कर टिरीरीनें अन् त्वेषाने
आवेशाने उंच तुझा स्वर.”

अशी प्रखर चेतावणी ‘तूंच भिला तर’ या कवितेत आढळते पण तिची प्रेमाची नसून काहीशी राजकीय आहे. ही कविता अगदी अलीकडची. तिच्या पहिल्या ओळीत्या पश्चात्तापाचा वास येतो का? या सगळ्यात प्रेमात तो सूक्ष्मपणे कोठे तरी वावरत असल्याचा भास होतो.’

"आज जरी अंधार भासतो गगनावर या असा,
उद्या बहरेल चंद्रिका नवी."

असल्या भरवसा सुखाद वेळी वाटला तरी तो फिकटच. प्रेमाची शिरजोरी आणि समाजाचे दडपण अशा दुहेरी सक्तीतून या काव्याला त्याचे विशिष्ट स्वरूप आले आहे.

मग हे काव्य त्या समाजाविरुद्ध बंडाचा आवाज का उठवीत नाही? कवीची प्रकृतीच मृदू हे त्याचे उत्तर नव्हे. सांकेतिक बंडखोरीसारखीच ही मृदुताही अनेकदा फसवी असते. निष्प्रेम जगाचा निषेध यातील अनेक कवितांत आहे. दूर रानी प्रीतीच्या तालात हिंडत उभ्या विश्वास निंदू हा साजणीचा बेत प्रेमापुरताच घेतला पाहिजे. इथे ममतेच मोबदला हवा म्हणून देश हा परका म्हणून प्रेमाला वनवास कवीला जगाला वैताग येतो तो त्यातील आपुलकीच्या - अभावामुळे पण यापलीकडे त्याचे जगाशी फारसे भांडणनाही.

"आवेगाचे आले वादळ
उधळविल्या मग ती वाऱ्यावर
उपदेशाच्या सर्व चिटोऱ्या!
सारे वादळ ओसरल्यावर
माझे मन पण अर्थांग भीषण
अनुतापतिच पार बुडाले!"

देशपांडयांनी लिहिल्या आहेत. त्या या संग्रहात नाहीत पण त्यांपैकी आर्यांचे गाणे या कवितेतील

"युक राज्य जगतावर पसरु; विश्व करु आर्य हे
जिंकत जिंकत पुढेच पसरु; कार्य शिरोधार्य हे
पतित पुरातन पुन्हा आज हा उंच धरु बावटा
उठा हो उठा..."

या ओळीवरून त्या श्रद्धेचे रंग आणि तिची दिशा ध्यानी यावी. समतेसारखे नवे आदर्श त्यांना मान्य नाहीत. धुंद प्रेमाच्या शाहिराच्या सामाजिक निष्ठा अशा असाव्यात हे विलक्षण आणि विसंगत वाटेल पण त्यांची संगती त्या पिढीच्या दुहेरी जीवनाच्या संदर्भात लावता येईल. निदान तत्कालीन निमसुधारक कवींची दुटप्पी मनोरचना देशपांडयांत नाही हा त्यांचा प्रामाणिकपणा लक्षणीय आहे. वस्तुत त्या बहुतेक कवींचे धर्म-संस्कृति-परंपराविषयक विचार देशपांडयांहून फारसे निराळे नव्हते पण गोंधळामुळे किंवा आधुनिकतेच्या बहाण्यासाठी त्यांनी काव्यांत ती नवी झूल पांघरली. म्हणून अनेकदा ती प्रेम काव्यातही अकारण लडबडताना दिसते. देशपांडयांच्या काव्यात कसलाच उसना साज नाही. त्यातील प्रेमाची उत्कटता असंबध्द विचारांमुळे कमी होत नाही हे त्या काव्य यशाचे रहस्य पण कवीच्या मनात मुरलेल्या विचारांचा वास त्या प्रेमाच्या वेषाला आणि प्रतिमांना येतो हेही खरे तो वास कोणाला आवडो वा न आवडो, पण तो सच्चा आहे

कवीचे जग प्रेमापुरतेच अपूर्ण आहे त्याला पूर्णता आणित असे प्रेमही आदर्श हवे त्याची आस या कवितेला लागली आहे. सुंदरतेचे मोहक दारूण घडले दर्शन ती चिन्मय तारा ज्याने ओसरतीही पहिली त्याची अशांती चिरदाहक ती सुंदरता कुठल्या व्यक्तीत सामावलेली नाही, म्हणून सवही दुर्लभ. तरल आणि बहुरंग कल्पना तिचे चित्र काढते, पण ती चित्रातून सृष्टीत उतरत नाही. अशी तिची अव्यक्त तऱ्हा अशा कुण्या तरी चांदणीकडे ही प्रेमकविता झेपावत आहे. कधी झिंगलेल्या कल्पनेच्या किमयेने पूर्तीचे कैवल्य लाभते. पण अशा कविता थोड्या आहेत फारच थोड्या 'गहन मनिषेने जतन केलेल्या, पण घडलेल्या मधुर मीलनाचे गीत अशी त्यांची जात आहे. पण ती धुंदी फार काळ टिकत नाही. ती उडताच बेचैनी येते एकलेपणाच्या झळांनी जीव होरपळून निघतो.

"अंतराचा रंग कोठेही जुळेना
भावनेचा गंध कोठे आढळेना
यौवनामध्ये कधीचा धुंडतो मी
आवडीचे फूल कोठेही फुलेना"

ते 'श्रेयस' वणवण फिरूनही गवसत नाही म्हणून थकलेले जीवन 'झुरते ओसाडीत बसून' त्याचे ऊन उसासे कवितेकवितेत आहेत. पण नको म्हणून ते खूळ सुटत नाही.

"जावा भास जुना म्हणून फिरलो
तो होत नाही कधी
सारे जीवन् डावलून बसलो
येऊन खेड्यात मी
प्रीतीच्या मुलुखांतलो मग पुन्हा आता नको बातमी."

समाधी सारख्या कवितेत त्या उदासीनतेल्या जणू मूर्तरूप येते. अपमृत्यू तरी त्या भयाण अतृप्तीचे प्रतिबिंब आहे. आशानिराशांची ही जीवनकथा सर्वस्वी कल्पनेने विणलेली आहे. की तिल्या अनुभवाची खात्री येईल का, असल्या शंका मनात चुकचुकतात. पण त्यांचा सहज निरास व्हावा असली अन्तागाळ कामगिरी ही नाही. आणि अनुभवाला वास्तवात कोंडून ठेवणेही काहीसे मठ्ठपणाचेच होईल. जेथे वास्तव आणि कवीचे स्वप्नजीवन सरमिसळ आहे, आणि त्यांची परस्परांशी लय लागते तेथे एकाला दुसऱ्यापासून अलग कसे काढणार ? अर्थात हे सगळे मानले तरी काही प्रश्न उरतातच. त्यांपैकी एक असा की यातील प्रेमपूर्तीच्या आणि तत्सम अनेक कवितांत स्त्रीजनांच्या मानाने साजणीत अधिक धिटाई आहे हे कसे ?

प्रेमाचे कवी हा देशपांड्यांवर छाप मारला जातो तसा ग्रामीण कवी हा आणखी एक इंग्रजीतील पास्टोरल पोएट चा हा मराठी अवतार दुसऱ्या उत्साहामुळे व्हायचे ते हिंडवडे येथेही झाले.

इंग्रजीतील या प्रकारामागे ग्रीक-लॅटिन-फ्रेंच परंपरेचे बळकट सूत्र होते. व त्याची कृत्रिमता हाही त्यातील एक धागा होता. आपण भाषांतरी घाईत ते नाव सैल करून खेडेगावाविषयीच्या सर्वच काव्याला लटकावून दिले. वस्तुत काव्याचा असा नकाशा अथवा तक्ता काढण्यात काही विशेष तथ्य नाही. पण असली अकारण कारकुनी आपल्या टीकाकारांच्या हाडीमासी खिळलेली आहे. देशपांड्यांना ग्रामीण कवी म्हटले की गावठळ शब्द अंतराअंतराने पेरून सुंदर निसर्ग आणि साधीभोळी माणसे यांच्या विषयी खोटी गाणी भरडणाऱ्यांपैकी ते एक असा व्यर्थ ग्रह होतो. त्यांचे काव्य शहरापासूनच नव्हे तर कसल्याच गावापासून दूर राहते त्यातील निसर्गसौंदर्य अनुषंगाने आलेले आहे. अनुपानासाठी ओढूनताणून आणलेले नाही. अगदीच अपवादादाखल चारदोन गाणी सोडल्यास त्यात कोठे जानपद भाषेचा अट्टाहासही नाही. आपले बरेचसे ग्रामीण काव्य हा शहरी कवींचा विरंगुळा आहे शब्दांशी खेळ आहे. देशपांड्यांत किंवा त्यांच्या काव्यात कोणत्याच शहरी अंश नाही म्हणून खेडवळ सोंग नाही. प्रा. भवानीशंकर श्री. पंडितांचे म्हणणे आडवळणाऱ्या वसती मुळे देशपांड्यांचे लक्ष शहरातील हायचायी कडे गेलेले नाही. त्यांनी धनगर, किसान व गवळी यांवर गीते लिहिली आहेत. परंतु ती त्या ग्रामीणांच्या आनंदावर आधारलेली आहेत. देशपांड्यांच्या कवितांत आनंदापेक्षा निराशा अधिक असल्याचे आपण पाहिलेच आहे.

त्यांनी इतरा वर लिहिले नाही. इतकी तद्रूपता त्यांच्या कवितांत आहे. आडवळणाची वसती इतके मात्र निरपवाद. खरे ना. घ. देशपांडे यांनी शिक्षणासाठी खामगाव व नागपूर येथील काही वर्षांचे वास्तव्य सोडल्यास मेहकर या खेडवजा तालुकागावी आपले आजवरचे आयुष्य घालविले.

देशपांड्यांच्या शैलीचा गोडवा वाखाणतानाही सावधपणा बाळगला पाहिजे कारण शैली आणि गोडवा यांबाबत शाळकरी मुलींना फार तर साजून दिसतील. अशा कल्पना आपल्या अनेक वरिष्ठ साहित्यिकांच्याही डोक्यात मुरडत असतात. अनुप्रास, यमक, पदलालित्य इ. चलाखीने वापरून गोड शैली बनविता येते काव्याचा विषय कोणताही असो अथवा नसो ही त्या कल्पनांची अक्का तिच्यापासून इतर. जसे काही विषयच काव्यमय तसेच काही शब्दही काव्यमय. ते कोठेही टाका, हटकून रुणा ग्रॅमोफोन अथवा चित्रपट या तेजीच्या बाजारांसाठी आजवर कित्येकांनी हे नाजुक धागे सांगूनवरून चालविले परंतु दरदार मानल्या जाणाऱ्या कितीतरी या सवंग काव्यमयतेचा मोह वारंवार पडला. देशपांड्यांच्या या कवितेत ओळीतून साजुक शब्द येतात अनुप्रासांचीही त्यात रेलचेल आहे, यमके आहेतच पण ही सगळी काव्याच्या ओघात येतात. त्यांचे वेगळे अस्तित्व जाणून नये अशी जणू ती यांत्रिक नाहीत अनेकदा ती स्वच्छंद आणि सैल तात. यमके आहेत, पण ती

नाहीत अनेकदा ती स्वच्छंद आणि सैल असतात. अनुप्रास फार झाले की प्रौढ रुचीला त्यांचे हसू येते पण हे व अन्य नादसौंदर्य अंगचेच असले, पूर्णपणे अर्थांकित असले, किंबहुना अर्थातूनच स्फुरलेले असले, की ते अनिवार्य वाटते. देशपांड्यांच्या काव्यात बहुश हीं अनिवार्यता पटते. त्यांचे प्रेमतादात्म्यच नादमय आहे ही जाणीव होते. क्वचित कोठे लकब म्हणून अनुप्रासादि अलंकारांचा अतिरेक भासेल पण तो अपवादा सारखा. एरव्ही ही सगळी नादाची मुलायम कुसर सुखविते. तिच्यात काहीच कृत्रिमता नाही. ती अलंकारासारखी नाही अंगभूत आहे. या काव्याचे अंतरंगच ललित आहे. त्यामुळे येते किती तरी साध्यासुध्या, रोकट म्हणजेच काव्य हीन शब्दांनाही लालित्याचे पाणी चढले आहे. म्हणून ते खुपत नाहीत. या समरसतेत देशपांड्यांच्या शैलीचे परम यश आहे.

या कविता वाचल्यानंतर त्यांच्या नादइतकीच त्यातील शब्दचित्रे फार काळ मनात तरळत राहतात.

"जरा निळी अन् जरा काजळी
ढगांत होती सांज पांगली
ढवळी ढवळी वर बगळ्यांची संथ भरारी!"

"हुंकारला पारवा
लेंगाळला काजवा
हालून गेला जरा काळोख चोहूंकडे!"

अशी किती तरी चित्रे वर्षानुवर्षे रसिक-स्मृतीला बैचैन करतात. पहिल्या वाचनातील तजेला छटेनेही हरपत नाही. पुनर्वाचनाने आतुरता मंदावण्याऐवजी दुणावते व अशाच तन्मय वाचनात एखादे अर्धोन्मिटले लावण्य अकल्पितपणे उमगते आणि वाचक आनंदाने शहारतो. क्षणभर जणू मूळ अनुभूती वाचकाच्या अंगोपांगांतून सळसळून जाते. सगळ्या देहाचे विषयावर ध्यान लावून कवी सगळे 'पंचरंगी सूर' शोषून घेतो. तन्मात्रांचे पाच नानाविध ध्यान लावून कवी सगळे आध्यात्मिक परिभाषा कोठे आढळली, तरी त्या नाचाच्या तंद्रीत शरीराचे भान सुटत नाहीच. उलट ते शतगुणित आणि अतिसूक्ष्म होते. सरूपता लाभते ती परमार्थाशी नव्हे, अनुभवाच्या ऐहिक विषयाशीच हा ब्रह्मानंद जगापारचा नाही.

ही सगळी सुंदर चित्रे कल्पनेच्या नशेत निर्माण झालेली आहेत. पण कवीच्या अंतर्जीवनानेच त्यांचे साहित्य पुरविले आहे. कुंद रंगांकडे कल दिसला, किंबहुना अनेकदा प्रतिमांच्या कडा क्वचित अथवा निसरड्या वाटल्या, तर त्यांचे रहस्य या कवि-वृत्तीच्या आतुरतेत शोधावे त्याच प्रमाणे हे प्रतिमाविश्व कोणत्या मर्यादित भासेल पण ही सगळी निर्मितीच केंद्रित आहे. कवी झिवल्यांचा भाव-कोषात रुंगलेला आहे. सर्व रात्रभर निजल्या, झिवलगा, कळीत सुगंध या सगळ्या प्रतिमा लहानशा परिसरातील आहेत. तो परिसरही वर सांगितल्याप्रमाणे अंधार, धुके, गर्द वन यांनी भारलेला आहे. त्याच्या छायेत कित्येकदा वेगळ्या प्रतिमाही नजर नीट

ठरण्यापूर्वी एकाच घाटाच्या, अगदी एकसारख्या, असाव्यात असे भासते. काही नादांच्या पुनरावृत्तीनेही तो भास बळावतो. पण असा वाटतो तेवढा तोचतोचपणा येथे नाही. प्रत्येक प्रतिमा त्या त्या अनुभवाला बिलगलेली आहे. या कवितांत वारंवार येणाऱ्या प्रतिमांचे परस्परांशी दुवे जोडल्यास त्या साखळीने कवीच्या अंतराचा परिघ अजमावता येईल. जी धुंद एकली नदी या प्रेमगीतांत पुन्हा पुन्हा भेटते, तिचा उगम, वळणे आणि खोली यांची कोडी कोणी उकलून दाखवील का?

हे सगळे चित्रसौंदर्य आणण्यासाठी देशपांड्यांना विशेषणांना फारसे वेठीस धरावे लागलेले नाही हे लक्षणीय आहे. विशेषणांच्या अतिरेकाने मढवलेली कविता आपल्या परिचयाची आहे. कवितेला वजन आणि नादमाधुर्य पुरविण्याचा तो खात्रीचा उपाय असावा. सांकेतिक विशेषणांच नव्हेत, तर हट्टाने बांधलेली वेगळी विशेषणेही अनेकदा मुळावरील लक्ष ढळवितात, आणि स्वतःकडे ते खेचून विसंगत अर्थलहरी निर्माण करतात. काव्ययोगातील नवशिक्यांना ही विशेषणांची बाधा फार!

देशपांड्यांच्या शैलीवर विविध संस्कार झाले असावेत. संतकाव्याच्या व्यासंगाची जशी साक्ष आहे, तसा लोकगीते व लावणीवाङ्मय यांचा रसरशीतपणाही येथे उतरलेला आहे. आपली बरीचशी आधुनिक कविता हे बळ पाठीशी नसल्यामुळे संस्कृत शब्द आणि इंग्रजी घडण या जोड्या उसनवारीत भरगळून गेलेली आहे. लावण्या-तील शिळा शृंगार अनेकांनी चोखाळला पण त्यांची

भाषेची रग ज्यांनी आत्मसात केली त्यांच्या काव्याला निराळेच पाणी चढले. देशपांडयांच्या भाषेतील वऱ्हाडी लकबी वाचताच उमगतील काहींना त्या खटकतील आपल्यास पेचकोशीत आणि पोटजातीत वापरतो ती शिष्ट भाषा, उरलेली अशिष्ट, हीच ज्यांच्या भाषाभिमानाची वऱ्हाडी व्याप्ती ते या अशुध्दा ना नाक मुरडतील. ही कविताच पुस्तकी नाही म्हणून तिची भाषाही शब्दकोशातून वेचून काढलेली नाही. ती नैसर्गिक आहे. पण हा वऱ्हाडी चा उपयोगही देशपांडयांनी फारच थोडया वेळा केलेला आहे. आणि तोही केवळ चूष म्हणून नव्हे.

ग्रंथिक भाषा आणि जिवंत बोली यांचे देशपांडयांच्या शैलीतील मिश्रण कोणाला गंगाजमनी वाटेल पण ते अनैसर्गिक नाही. काव्यमय भाषा कृत्रिमच असली पाहिजे, रोजच्या व्यवहारात मळलेले शब्द रसहानी करतात, ही ज्यांची काव्यविषयी आणि एकंदर साहित्याविषयी सोवळी कल्पना त्यांना हा संकर दुःख येईल. फार नको वाकू जरी उंच बांधा फार ढाकू तुझा गौर खांदा या उघडया आणि फाजील सोप्या, भाषेने एका टीकाकाराला अस्वस्थ केल्याचे आठवते. पण आपल्या काव्यशैलीचा इतिहास नीट निरखला तर वेळोवेळी क्रांतिवंत कवींनी ही कृत्रिमतेकडे पुस्तकी पणाकडे झुकू नये म्हणून बोलीचा मोकळेपणाने उपयोग केल्याचे ध्यानात येईल. त्या त्या वेळी गतानुगतिक वाचक आणि टीकाकर यांनी ही गद्यप्राय काव्यहीन खडबडीत शैली- ही शैलीच नव्हे म्हणून ओरड केलेली आहे. केशवसुतापासून आजच्या नव्या कवितेपर्यंत

टप्प्याटप्प्यावर ती नियमितपणे झाली. पण त्याने कोणी खरा कवी बिचकून गेलेला नाही. माधव ज्युलियन, गिरीशोंध, कोणकर व अनिल इत्यादींनी रूढ शैलीत हा कसदार बोलीचा प्रवाह मिसळण्याचे कमीअधिक धाडसी प्रयोग केले ते अभ्यासण्यासारखे आहेत. पण त्यांतील जड संस्कृत शब्दांचे काय? ज्ञानसंस्कारांनी समृद्ध झालेल्या कवीच्या व्यक्तित्वाचे ते सहजोद्गार असतात. जेव्हा ते तसे नसतात, आणि भरदस्त पणाच्या सोसाने मारूनमुटकून आणलेले असतात, तेव्हा जाणत्या वाचकाला त्यांची कृत्रिमता खटकते. कवितेची भाववृत्ती आणि तिची भाषा यांची मिळणी झाली पाहिजे तेथे सुट्या शब्दांचे गणगोत्र तपासण्याची गरज नाही. कोठे साधेपणाही कृत्रिम होईल म्हणून याबाबत निर्वाणीचे नियम आखून देणे महत्त्वाचे ठरेल. तरीही शैली आणि बोली यांत स्पृश्यास्पृश्यभाव मानणे हे त्याहून अधिक महत्त्वाचे याबद्दल वाद नसावा. देशपांड्यांनी मुख्यतः जिवंत बोलीतून आपली शैली बांधलेली असली तरी ठायी ठायी, कधी विशिष्ट अर्थच्छटा दाखवण्यासाठी तर कधी रसाच्या ओघात, संस्कृत शब्दांचा वापर बिनासायास केला आहे. किशोरी अथवा उत्कंठा यांसारख्या कवितांत तर कोणाला तो अतिरिक्त वाटेल. पण रसात न्हाऊन निघालेल्या आणि अर्थाने लळपणाऱ्या त्या शब्दांतील जाड्य जाऊन त्यांवरही बोलीतील चैतन्याचा त्यांना स्पर्श होतो. ही किमया सर्वच गंगाजमनी काव्याच्या भाग्यात असते असे नव्हे!

पण फक्त शब्दांच्या वापराबाबतच ना. घ. देशपांड्यांत बोलीचे सामर्थ्य आणि सहजता आहे. असे नाही तिच्या उच्चारांतील मोकळीकही कवितेत बोलण्याची लय आणि मस्ती आणते. एरव्ही गणमात्रांच्या करड्या हिशेबाने आणि यतीच्या धाकात कवाइत केल्यासारखी चालणारी कविता आपल्या सरावाचीच आहे। या कवितेतील सैलपणा थोडासा स्वच्छंदपणा तिच्या हाल चालीत सहजसौंदर्य आणतो.

कविता म्हणजे कृत्रिमता, हरघडीच्या जीवनापासून दूर ठेवलेला कसलातरी पवित्र उद्योग हा पिढ्यानपिढ्या आपल्या कु-शिक्षणाने मनात भरविलेला भास असल्या शैलीने कमी होईल. असे अनेक वातड गृह आणि कोत्या कल्पना खिळखिळ्या करण्याचे सामर्थ्य ना. घ. देशपांड्यांच्या काव्यात आहे.

नादांचीच नव्हे तर शब्दांचीही पुनरावृत्ती करण्याची देशपांड्यांची लकब काहीशी लोकगीतांतून उचलल्यासारखी वाटली, तरी ती त्यांच्या काव्यप्रकृतिला पूर्णपणे अनुरूप आहे. अशा पुनरावृत्तीने सहसा वाचक जणू गुंगीमुळे डोलतो, तर कधी चेतविला जातो. ही उभय करामत या काव्यात आढळेल पण दुसरी पेक्षा पहिलीच अधिक.

अशी विविध सौंदर्य देशपांडयांच्या काव्यात आहेत. काही उडत्या वाचनातच मनात भरतात, तर काही इतकी गहिरी आहेत की त्यांचा थांग तरल आणि तल्लीन वाचनातच लागेल. हे काव्य नवे की जुने, त्यातील जीवनदर्शन पुरोगामी की प्रतिगामी इ. प्रश्न त्याच्या आस्वादाआड येऊ नयेत. कवीने स्वतःशी पूर्ण इमान राखले आहे या प्रभावी सत्यातच अशा प्रश्नांचे निराकरण होते. रसिकाला मोह घालणारी या कवितेची कांती उसनी नाही. ती अंगची आहे. भाव आणि त्याचे गीत यांच्या गाढ मिलनातून निथळणारी ती कांती काहीशी चिकित्सेपासच राहणार. तिची धुंदी रसिकांत उतरने यातच तिचे साफल्य आणि त्यांचे त्रृण.

15/11/2022

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad